RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 August 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 August, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : दुसरा | ऑगस्ट २०१६



मुक्तीचा सर्वांना एकसमान हक्क आहे (सत्संग) 5

मृत्यु येण्यापूर्वीच मरा (संदेश) 17

सत्संगाची महानता (गोष्ट) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



मुक्तीचा सर्वांना एकसमान हक्क आहे

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी
कोलंबिया – १४ जून १९९५

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी वंदन करतो ज्यांनी आपणांस भक्तीचे दान दिले, भक्ती करण्याची संधी दिली आणि या दीन आत्म्यावर दया केली. मी नेहमी सांगतो की परमेश्वराचे प्रिय संत–महात्मा या जगात परमेश्वराच्या आदेशानुसार येतात व त्याच्या आदेशाचाच प्रचार करतात. परमात्म्याने महात्म्यांना या जगात आत्म्यांच्या सेवेसाठीच पाठविलेले असते. जेव्हा परमात्मा त्यांना परत बोलवितो ते या जगातून निघून जातात.

कोणतेही महात्मा या जगात एखाद्या नव्या समाजाची स्थापना करण्यासाठी वा अगोदर अस्तित्वात असलेला समाज नष्ट करण्यासाठी येत नाहीत. ते तर आपल्याकडून परमात्म्याची भक्ती करवून परमात्म्यास प्राप्त करवून देण्यासाठी येतात. जोपर्यंत महात्मा या जगात देहरूपात असतात तोपर्यंत त्यांच्या शिकवणूकीवर अंमल केला जातो. प्रत्येक देशातील व प्रत्येक समाजातील आत्मा त्यांच्या चरणी बसून लाभ घेतात, परंतु जेव्हा असे महात्मा संसारातून निघून जातात तेव्हा तेथे इतरांची फसवणूक करून स्वत:चा निर्वाह करणारे उत्पन्न होतात.

महात्म्यांची शिकवण सर्व संसारासाठी असते, परंतु आपण त्यांच्या शिकवणूकीला एखाद्या समाजाचे स्वरूप देऊन एकमेकांशी लढतो व वाद घालतो. तुम्ही जातीवादाच्या संकुचित विचारांपलिकडे येऊन पहा, एखाद्या महात्म्यांची वाणी वाचून पहा. सर्व महात्मा हेच म्हणतात की, ''सर्वांचा परमात्मा एकच आहे. असे नाही की अमेरिकेतील लोकांचा परमात्मा निराळा आहे, कोलंबियातील लोकांचा परमात्मा निराळा आहे, युरोपमधील लोकांचा परमात्मा निराळा आहे व हिंदुस्थानातील लोकांचा परमात्मा निराळाच आहे.'' गुरू गोविंद सिंहजींनी सांगितले आहे की,''आपल्या सर्वांचे नेत्र एकसमान

आहेत व आपल्या अंतरात बोलण्याची शक्तीदेखील एकसमानच आहे. बाह्यदृष्टीने आपल्या भाषा निरनिराळ्या जरी आढळल्या तरी आपला जन्म व मृत्यु एकाच पद्धतीने होतो.'' सर्व महात्मांनी हेच सांगितले आहे की प्रियजनहो, जगातील प्रत्येक मुलास मातेच्या उदरात रहावेच लागते. त्यास मातेच्या दूधाची व पालनपोषणाची गरज असते मग ते मुल कोणत्याही देशात वा समाजात जन्मलेले असो.

संत सांगतात की सर्वांस जन्मास घालणारा परमात्मा एकच आहे. परमात्मा सर्वांच्या अंतरात अशारीतीने सामावलेला आहे जसे फुलात सुगंध, दगडात अग्नी, मेहंदीच्या पानात रंग, तीळात तेल आणि दूधात तूप असते. जोपर्यंत आपण योग्य युक्तीचा वापर करून दूधास घुसळत नाही तोपर्यंत दूधाचे तूपात रूपांतर होऊ शकत नाही. ज्यास ही युक्ती माहीत असते तो सर्वप्रथम दूध गरम करून त्याचे विरजण लावतो, त्याचे दही बनल्यानंतर ते घुसळतो तेव्हा त्यातून लोणी निघते आणि ते लोणी कडवल्यानंतर त्याचे तूप बनते. खरेतर तूप दूधामध्येच सामावलेले असते. त्याचप्रमाणे परमात्मा आपल्या शरीरात सामावलेला आहे. परंतु आपणांस जाणीव नसते की आपण कानाद्वारे, नाकाद्वारे वा नेत्रांद्वारे आपल्या शरीरात दाखल होऊ शकतो की त्यासाठी एखादा निराळा रस्ता आहे का? जर आपली एखाद्या घरात दाखल होण्याची इच्छा असेल परंतु त्या घराचा दरवाजा कुठे आहे हे आपणांस ठाऊक नसेल तर आपण त्या घरात कसा बरे प्रवेश करू शकू?

खरेतर विद्यार्थ्याच्या अंतरातच विद्या असते. शिक्षकाच्या अंतरातील विद्या जागृत झालेली असते. जेव्हा विद्यार्थी शिक्षकाच्या आदेशाचे पालन करतो तेव्हा शिक्षक विद्यार्थ्याच्या अंतरातील ती विद्या जागृत करतो. जो विद्यार्थी शिक्षकाकडे जात नाही, मग भले विद्या त्याच्या अंतरात जरी असली तरी तो अशिक्षितच राहतो. अशाच प्रकारे आपण शाळेत जाऊन विद्या प्राप्त करून डॉक्टर किंवा इंजिनीयर बनू शकतो. आपण जे काही बनू इच्छितो त्याचा अभ्यास करावा लागतो, तो कोर्स पूर्ण करावा लागतो.

आपण कोणत्याही इंजिनीयर, वैज्ञानिक वा डॉक्टरला जाऊन विचारले की तुमच्या शिक्षकांनी एखादी जडी–बूटी वाटून, ती तुम्हांस भरवून त्याद्वारे त्यांचे ज्ञान तुम्हास दिले होते का? ते आपणांस हेच सांगतील की, आम्ही आमच्या शिक्षकांची सोबत केली, तेव्हाच आम्ही आमचे ध्येय साध्य करण्यात यशस्वी झालो. आज जे अधिकारी उच्च पदावर कार्यरत आहेत, ते आपले सुखमय जीवन व्यतीत करीत आहेत याचे कारण त्यांनी शाळा–कॉलेजात जाऊन खूप परिश्रम केले ज्याचे ते फळ उपभोगत आहेत.

मुल जेव्हा शाळेत जाते तेव्हा शिक्षक त्याच्यासमोर एम ए पर्यंतची सर्वच्या सर्व पुस्तके समोर ठेवत नाहीत किंवा एम ए पास होण्यासाठी सोळा वर्षे लागतात असेही सांगत नाहीत. जर शिक्षकाने त्याच्यासमोर ही सर्व पुस्तके ठेवली तर मुल घाबरून जाईल व त्याच्यावर मानसिक दबाव पडेल. त्यामुळे शिक्षक 'अबकड' पासून सुरुवात करतो व मुल हळूहळू शिक्षणात प्रगती करीत रहाते आणि कधी मोठे होते हे त्यास कळतही नाही. शिक्षक स्वत:चे कसब त्या मुलास दर्शवतात. परमपिता परमात्मा प्रकाशरूप व तेजोमय आहे. जे महात्मा अंतर्यात जातात त्यांची वाणी वाचून आपल्यास कळते की:

नाम जपत कोट सूर उजियारा बिनसे भरम अँधेरा।

आपण आपल्या नेत्रांनी येथील एका सूर्याकडेदेखील एकटक पाहू शकत नाही. परमात्म्याच्या एका रोमाशी तुलना करोडो सूर्यदेखील करू शकत नाहीत, तर मग आपण त्या परमात्म्याकडे एकटक कसे बरे पाहू शकू? इतका प्रखर प्रकाश कसा बरे सहन करू शकू?

जसे मी अगोदरही सांगितले आहे की शिक्षक 'अबकड' पासून सुरुवात करून विद्यार्थ्यास एम ए पास करवितात तसेच संत–महात्मा देखील सर्वप्रथम सत्संगांमार्फत आपल्या अंतरात परमात्म्यास प्राप्त करण्याची इच्छा, विरह व तळमळ निर्माण करतात. सत्संगांमार्फत महात्मा आपणांस सांगतात की प्रियजनहो! परमात्मा पवित्र व निर्मळ आहे. पूर्वी आपला आत्मादेखील पवित्र व निर्मळ होता. परंतु त्याने मनाची साथ केल्यामुळे तो मलिन झालेला आहे.



जर आपल्या घरी आपला एखादा मित्र, पाहुणा अथवा उच्च पदाधिकारी येणार असेल तर आपण आपल्या घराची खूप साफ–सफाई करतो जेणेकरून त्याने आपल्या घराला नाव ठेवू नये किंवा तो नाराज होऊ नये. प्रापंचिक नातेवाईकांनी नाव ठेवू नये म्हणून आपण किती काळजी घेतो? परंतु इतका निर्मळ व सर्वश्रेष्ठ तसेच सच्चखंडात रहाणाऱ्या परमात्म्याने आपणांस जे जीवन दिलेले आहे, त्या जीवनाच्या सफाईकडे आपण किती लक्ष देतो?

खरे मंदीर, गुरुद्वारा वा चर्च आपले हे शरीरच आहे. आपण परमात्म्यासाठी धर्मस्थान बनवितो, त्याजागी कोणतेही कुकर्म करीत नाही, त्याजागेची चांगली स्वच्छता ठेवतो, तेथे धूप उदबत्या कापूर वगैरे लावतो. परंतु परमात्म्याने जे मंदीर बनविलेले आहे ज्यात तो स्वत: बसलेला आहे, काय आपण कधी त्या मंदीराच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले?

जे लोक असा प्रचार करतात की पशू–पक्षी मनुष्याच्या आहाराकरीता बनविले गेले आहेत ते आपणांस चुकीचा मार्ग दर्शवितात. प्रियजनहो! हे सर्व

पशू–पक्षी परमात्म्याने निसर्गाच्या श्रृंगारासाठी निर्माण केलेले आहेत. परमात्म्याने घडविलेल्या धरतीवर जितका एका मनुष्यास जगण्याचा हक्क आहे तितकाच हक्क पशू–पक्षांचादेखील आहे, कारण परमात्म्याने सर्वांची निर्मिती केलेली आहे व तो सर्वांच्याच अंतरात बसलेला आहे. आज जे पशू–पक्षी बनलेले आहेत कदाचित ते पूर्वजन्मी मोठे शेठ–सावकारही होऊन गेले असावेत. त्यांनी मनुष्यजन्मात येऊन जी काही पापं केली, गुन्हे केले त्याची सजा भोगण्यासाठी म्हणून परमात्म्याने त्यांना कनिष्ठ योनीत जन्माला घातले.

संत आपणांस प्रेमाने सांगतात की प्रिय मुलांनो, आपण इतरांच्या दु:खास स्वत:चे दु:ख समजा. जर जनावराची कत्तल करताना कसायाने चुकून स्वत:च्या हातावर सूरा चालवला तर तो किती ओक्साबोक्सी रडतो आणि आपले दु:ख किती मोठे करून वर्णन करतो! जीव तर सर्वांमध्ये एकसमानच असतो. जेव्हा एखादा व्यक्ती कोंबडा, बकरा, डूक्कर अथवा इतर प्राण्याची कत्तल करतो, तेव्हा ती जनावरेदेखील किती किंचाळून रडतात, आक्रोश करतात परंतु कोणी त्यांचा आक्रोश ऐकला आहे? कबीर साहेब सांगतात,''सर्वांना एकसमान वेदना होतात,स्वत:चा जीव सर्वांना प्रिय असतो.''

महाराज कृपाल सांगत असत,''ज्यांना आपण पाहू शकतो त्यांच्याप्रती आपण प्रेम–सहानुभूती न बाळगता त्यांचे प्राण घेण्यास तयार होतो आणि आपण ईश्वर–प्रेमाचा तसेच ईश्वर भक्तीचा दावा करतो. ज्यास पाहिलेले नसते त्यावर प्रेम कसे करू शकतो? त्याची भक्ती कशी करू शकतो?''

जे लोक परमात्म्यास आपल्या अंतर्यात प्रगट करून घेतात, त्यांचे प्रत्येक जीवावर प्रेम असते, मग भले तो कोणत्याही देशाचा नागरीक असो, पशू–पक्षी असो. प्रत्येकाच्या अंतरात परमात्मा आहे हे त्यांना माहीत असते.

जेव्हा आपण रोज–रोज महात्मांचा सत्संग ऐकतो, त्यांची संगत–सोबत करतो, तेव्हा आपल्या अंत:करणात जे दोष, पाप व कनिष्ठ दर्जाचे विचार असतात ते आपण हळूहळू अंतरातून दूर सारू लागतो आणि अखेरीस आपण महात्मांच्या शिकवणीनुसार आपले चांगले व निर्मळ जीवन जगू लागतो व भले मनुष्य बनतो.

महात्मा आपल्या अंतरात नामाची ठिणगी निर्माण करतात, नामाचा दीपक प्रज्वलीत करतात. महात्मा आपणांस समजावतात की,''प्रिय मुलांनो! तुम्ही रोज-रोज ध्यान-अभ्यास करा. परमात्म्याच्या दरबारातून अर्थात सच्चखंडातून जो ध्वनी निर्माण होत आहे, तो आपण रोज रोज ऐका. आपण ज्या कामाचा सराव रोज-रोज करू त्या कामात आपणांस नैपुण्य मिळेल.''

जगातील सर्व धर्म-ग्रंथ यागोष्टीची हमी देतात की संतांच्या बाह्यजगातील देहाकडे पाहून असे समजू नये की हा आपल्यासारखाच सामान्य मनुष्य आहे. प्रिय मित्रांनो! संतांची पात्रता निराळीच असते. एखादा व्यक्ती अशिक्षित असतो व दुसरा मनुष्य इंजिनीयर असतो, त्या दोघांचे चेहरे मनुष्याचेच असतात परंतु त्यांच्या पात्रतेत खूप फरक असतो.

आपल्या आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म आणि कारण असे तीन पडदे आहेत. जोपर्यंत आपण स्थूल जगात असतो तोपर्यंत संत-महात्मा स्थूल देहात येऊन आपल्या हृदयात सत्संगामार्फत अंतर्यात जाण्याची तळमळ निर्माण करतात आणि परमात्म्यास प्राप्त करण्याचे फायदे समजावतात. जेव्हा आपण ध्यान-अभ्यासाद्वारे स्थूल पडदा बाजूस सारून सूक्ष्म देशात जातो, तेव्हा आपले प्रिय सतगुरू सूक्ष्म स्वरूप धारण करतात. जेव्हा आपण कारण पडदा बाजूस सारतो, तेव्हा ते शब्दरूप होऊन दर्शन देतात. जसे-जसे आपण अंतर्यात प्रगती करत जातो, तस-तसे सतगुरू अंतर्यात आपले स्वरूप बदलत जातात. जेव्हा आपण सच्चखंडात पोहोचतो तेव्हा आपल्या लक्षात येते की ज्या महात्म्यांना आपण एक साधारण मनुष्य समजत होतो, त्यात आणि परमात्म्यात काहीच फरक नाही.

राम कबीरा एक भए हैं कोई न सके पछानी।

सांसारिक दृष्ट्या असे महात्मा एक अत्यंत सामान्य जीवन व्यतीत करतात. त्यांच्या अंतरात जितकी नम्रता असते तितकी प्रापंचिक लोकांमध्ये नसते. असे महात्मा कोणत्याही समाज, संस्था वा सभा-मंडळावर ओझे बनत नाहीत, उलट ते आपल्या स्वमेहनतीच्या मिळकतीतून स्वत:चा

उदरनिर्वाह करतात आणि आपल्या सेवकांनादेखील तोच उपदेश देतात की प्रिय शिष्यांनो, जेव्हा तुम्ही आपल्या उदरनिर्वाहासाठी पवित्र मार्गाने कमाई करता तेव्हाच तुम्ही अंतर्यात जाऊन परमात्म्यास तेव्हाच भेटू शकता.

जे महात्मा आपल्याकडून कोणतीही फी न घेता, आपला समाज न त्यागू देता, आपली मातृभाषा व देश न बदलता आपली विनामुल्य मजुरी करीत असतील परंतु तुम्ही त्यांपासून फायदा न घेता त्यांस विनाकारण शिवीगाळी करीत असाल तर तुम्हीच विचार करून पहा तुम्ही किती मोठी घोडचूक करीत असाल?

नाम की महिमा अपरम्पार, जावां सतगुरु के बलिहार, (२)

१. पलक झपकते कट जाते हैं, उसके कष्ट कलेश,
जिसके मन मंदिर में रहते, सतगुरु जी हमेश, (२)
और नाम से बड़ा नहीं है, कोई भी आधार,
नाम की महिमा ...

२. नाम जपा कबीर नानक ने, जग में किया उजाला,
लेकर प्रभू का नाम पी गई, मीरा जहर प्याला, (२)
नित नियम से करो नाम से, जीवन का श्रृंगार,
नाम की महिमा ...

३. प्रभू से बेमुख रहा जो कोई, उसने जन्म गंवाया,
उसका जीवन सफल हो गया, जीसने नाम ध्याया, (२)
जो भी चढ़ा नाम की नईया, उतर गया भव पार,
नाम की महिमा ...

४. नाम की महिमा नाम ही जाने, यां जिस नाम ध्याया,
'अजायब' कृपाल के चरनी लग के, कोटि-कोटि यश गाया(२)
जो भी द्वारे आया गुर के, उसका बेड़ा पार,
नाम की महिमा ...

आपल्यापुढे स्वामीजी महाराजांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे, लक्षपूर्वक ऐका. ते आपणांस सावध करतात की प्रिय शिष्यांनो, हे जग एक रंगमंच आहे आणि पात्र रंगमंचावर येऊन आपआपली भूमिका करतात, तसे करत असता ते तात्पुरती नाती बनवितात. कोणी राजा बनतो तर कोणी राणी बनते, कोणी एका पात्राची भूमिका करतो तर कोणी दुसऱ्या पात्राची भूमिका करतो. त्यात एखादा थट्टा–मस्करी करणारा विदूषक तर दुसरा दुष्ट खलनायकदेखील बनतो. ते आपआपली भूमिका करून रंगमंचावरून जेव्हा खाली येतात तेव्हा त्यांमध्ये ना कोणी राजा असतो, ना राणी असते, ना कोणी थट्टा–मस्करी करणारा विदूषक असतो व ना कोणी दुष्ट खलनायक असतो. आपण प्रेक्षक त्यांच्यापैकी काहींच्या अभिनयाची स्तुती करतो की यांनी खूप छान अभिनय केला व आपणांस अनेकांचा अभिनय आवडत नाही.

याचप्रमाणे जेव्हा आपण या संसाररूपी रंगमंचावर येतो तेव्हा आपण येथे तात्पुरती नाती बनवितो. कोणी माता, कोणी पिता तर कोणी बहिण–भाऊ बनून या जगात येतो. आपण आपआपला अभिनय करतो. मातेस माहित नसते की माझा मुलगा कोणत्या योनीतून आलेला आहे? ना पत्नीस माहित असते की माझा पती कोणत्या योनीतून आलेला आहे? ना पतीस माहित असते की माझी पत्नी कोणत्या योनीतून आलेली आहे? आपल्या शेवटच्या भूमिकेचा अभिनय करून जात असताना ना पत्नी पतीला सांगून जाते की मी कोणत्या योनीत जाईन, ना पती पत्नीला सांगून जातो, ना मुलगा वडिलांना सांगू शकतो की मी कोणत्या योनीत जाईन व तेथे माझी कोणाशी भेट होईल? आपणही संसारात अशीच तात्पुरती नाती बनविलेली असतात. आपणांस पूर्वजन्माची नाती आठवत नाहीत तर आजची नाती पुढल्याजन्मी कशी आठवतील?

संत आपणांस सावध करण्यासाठी येतात की पहा प्रियजनहो, आपण येथे काही ठराविक काळापुरतेच आला आहात, आपले घर सच्चखंड असून आपला आत्मा सत्पुरूषाचा अंश आहे. आपणांस एके दिवशी हे घर आणि हे

शरीर देखील सोडून जावे लागेल. दयाळू परमात्मा ज्यावर उपकार करतो ज्या आत्म्याची आपल्याशी भेट घालू इच्छितो त्यास सर्वप्रथम तो मनुष्यजन्म बहाल करतो. ज्यावर त्याहूनही अधिक दया करतो की याने यापुढे चौऱ्याएंशी लक्ष योनींच्या जन्म-मरणाची सुखं-दु:खं भोगू देऊ नयेत, त्यास तो एखाद्या महात्म्यांच्या चरणी आणतो. जेव्हा महात्मा आपल्यावर दया करतात तेव्हा ते आपणांस अंतर्यात जाण्याचे साधन आणि पद्धत समजावतात व आपणांस खऱ्या शब्द-नामाशी जोडतात. गुरू नानक साहेब सांगतात:

इकनी लाहा ले चल्ले इक चल्ले मूल गँवाए जिओ।

एक मनुष्यजन्मात येऊन परमात्म्याची भक्ती करून परमात्म्यात विलीन होतो, तर दुसरा मनुष्यजन्मात येऊनदेखील स्वत: तर शांत रहात नाहीच वरून आपल्या शेजाऱ्यांना देखील शांतीने राहू देत नाही आणि तो परमात्म्याने दिलेली मनुष्यजन्माची सुसंधी गमावून निघून जातो.

देखो सब जग जात बहा। देखो सब जग जात बहा।।
देख देख मैं गति या जग की। बार बार यों वर्ण कहा।।



स्वामीजी महाराज प्रेमाने सांगतात,''मनुष्यजन्म खूप मौल्यवान आहे, हा मुल्य देऊन मिळत नाही. परंतु आपण हा मनुष्यजन्म कवड्यांच्या भावात आणि विषय–विकारांमध्ये व्यर्थ गमावत आहोत.'' म्हणून परमात्मा आपल्या प्रिय पुत्र संत–महात्म्यांना वारंवार कधी कोणत्या समाजात तर कधी कोणत्या देशात पाठवितात. महात्मा आपणांस सावध करतात की,''प्रिय मुलांनो, आपण जागृत व्हा, जर मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतरही आपण परमात्म्याची भक्ती करून परमात्म्यास प्राप्त केले नाही तर मग माहित नाही कदाचित पुढचा जन्म अशा जागी झाला जिथे चुकूनही आपणांस परमात्मा मिळू शकणार नाही, तर काय कराल?''

महाभारतात एक कथा येते की यक्षाने युधिष्ठीरास विचारले,''याजगात सर्वात आश्चर्यजनक गोष्ट कोणती आहे?'' युधिष्ठीर म्हणाला,''आपण स्वत:च्या डोळ्यांनी जगात लोकांना मरताना पहातो, संसार सोडताना पहातो. मनुष्यास रिकाम्या हाती परत जाताना देखील पहातो आणि त्यांस खांद्यावर उचलून स्मशानभूमीत पोहोचवूनही येतो, परंतु ही गोष्ट स्वीकारत नाही की एके दिवशी आपल्या बाबतीतही हेच घडणार आहे. आपण विचार करतो, कदाचित मृत्यु इतरांसाठी आहे, आपल्यासाठी तर मांसाहार–मद्यपान, मौज–चैन आणि भोग–विलास आहेत.'' कबीर साहेब सांगतात:

यह तन कागज की पुड़िया बूँद पड़त गल जाओगे।
कहत कबीर सुनो भई साधो ईक नाम बिना पछताओगे।

संत सांगतात,''मृत्यु एक अटळ सत्य आहे जे आपण मान्य करण्यास तयार नसतो. सर्वसाधारणपणे जेव्हा एखाद्या व्यक्तीचा मृत्यु होतो तेव्हा आपण असे म्हणू लागतो की डॉक्टर वेळेवर पोहोचले नाहीत किंवा डॉक्टरने चुकीचे औषध दिले किंवा ऑक्सिजनचा सिलेंडर उशिरा पोहोचला किंवा त्याला हृदयविकाराचा धक्का बसला.'' गुरू नानक साहेब सांगतात:

जिसकी चीज सोई ले जाए, भूला रोवन हारा हे।

गुरू नानक साहेब सांगतात,''प्रिय मुलांनो, ज्या परमात्म्याने या जगात पाठविलेले आहे, ज्याने जीवन दिलेले आहे, तोच त्यास घेऊन गेला. आपण त्याच्या मोहात रडून चूक करीत आहात. डॉक्टरकडे आजारपणावरचे औषध असते, तो रोगावर इलाज करू शकतो, परंतु मृत्युचा इलाज कोणत्याही डॉक्टरकडे नाही.'' कबीर साहेब सांगतात:

वैद्य कहे हौं ही भला दारू मेरे वस, ऐह ते वस्त गोपाल की जब भावे ले खस।

संत आपणांस सावध करतात की श्वास खूप मौल्यवान आहेत, आपण या मनुष्यजीवनात बसून परमात्म्याची भक्ती करून परमात्म्यास प्राप्त करा.

चारों जुग चौरासी भोगी। अति दुख पाया नर्क रहा।।

स्वामीजी महाराज सांगतात की,''आपण सतयुग, त्रेता, द्वापर आणि कलियुगातही याजगात जन्माला आलो. आपण कधी पशू, कधी पक्षी तर कधी कोणते जनावर बनलो, कधी पर्वतांच्या योनीत तर कधी झाडांच्या योनीत गेलो. जिथे कुठे जाऊन जन्म घेतला तेथे दु:खंच दु:खं भोगली, संकटेच संकटे ओढावली व कष्ट सोसले. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

नानक दुखिया सब संसार, सो सुखिया जिस नाम आधार।

कबीर साहेब सांगतात :

कोई तो तन मन दुखी कोई नित उदास।
एक एक दुख सबन को सुखी सन्त का दास।।

जन्म जन्म दुख पावत बीते। एक छिन कहीं न चैन लहा।
पाप पुन्य बस बिपता भोगी। नहिं सतगुरु का चरन गहा।

स्वामीजी महाराज सांगतात,''मुक्ती नामात आहे, नाम सतगुरूंकडून मिळते. जर आपण नेक कर्म केली तर शेठ–सावकार बनून जन्म घेऊ, आपल्या हाती सत्ता येईल, हातातली केरसुणी निघून जाईल व आपण झोपडीतून महालात राहू लागू.''

अब यह देह मिली किरपा से। करो भक्ति जो कर्म दहा।।
अब की चूक माफ नहिं होगी। नाना विधि के कष्ट सहा।।

आपण प्रेमाने सांगता की,''आपणांस आपली कर्मं नष्ट करावयाची असल्यास आपण सतगुरूंची भक्ती करा. आपणांस मनुष्यजन्माची सुसंधी लाभलेली आहे, जर ती गमावली, मनुष्यजन्मात भक्ती केली नाही, तर ती आपली घोडचूक होईल, परमात्मा आपल्या या चूकीची माफी देणार नाही.''

परमात्म्याची भक्ती अनमोल धन आहे, उत्तम पदार्थ आहे. ती काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांचा नाश करते. परमात्म्याची भक्ती खऱ्या अर्थाने सुखदायक आणि प्रतिष्ठादायक आहे. परंतु हे भक्ती–धन आपण स्वत:हून प्राप्त करू शकत नाही. त्यासाठी आपणांस परमात्म्याच्या प्रिय भक्तांकडे जाऊन भक्तीचे योग्य साधन व पद्धत शिकून घ्यावी लागते. परमात्म्याचे प्रियजन परमात्म्याहून मोठे नसतात, परंतु परमात्मा आणि त्यांमध्ये काही फरक नसतो.

गफलत छोड़ भुलाओ जग को। नाम अमल अब घोट पिया।।
मन से डरो करो गुरु सेवा। राधास्वामी भेद दिया।।

स्वामीजी महाराजांनी या छोट्याशा वाणीत आपल्याला अत्यंत प्रेमाने समजावले की हा संसार मनुष्यजन्मापासून फायदा घेण्याऐवजी तो कवडीमोलात गमावत आहे. आपल्या आणि परमात्म्याच्या दरम्यान जर कोणता अडथळा असेल तर तो आपल्या मनाचा आहे. याजगात आपला इतर कोणीही शत्रू नाही, आपला शत्रू आपले मन आपल्या अंतरातच बसलेले आहे. मनाच्या सांगण्यावरून आपण इतरांचे प्राण घेतो, भाऊ आपल्या भावाचे शीर गाजर–मुळ्याप्रमाणे कापत आहे. प्रियजनहो, मनाचे सांगणे ऐकू नका. आपण सर्व एकाच पित्याची मुले आहोत. सर्वांवर प्रेम करा आणि शांतीपूर्वक रहा. परमात्म्याची भक्ती करून परमात्म्यास प्राप्त करा.

***

मृत्यु येण्यापूर्वीच मरा

परमसंत कृपाल सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींना दिलेला महत्वपूर्ण संदेश

ज्या व्यक्तीने मन आणि इंद्रियांच्या विळख्यातून स्वत:ची सुटका करून घेतली आहे, परमात्म्यास प्राप्त करून घेतले आहे, त्या व्यक्तीस सर्वसामान्य मनुष्यास दिसणाऱ्या या जगाचा रंगछटांपेक्षा हे जग वेगळेच दिसते. त्याचा या जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन निराळाच असतो. स्वत:च्या मानव निर्मित कृत्रिम ओळखीने त्याच्यावर इतका प्रभाव टाकला आहे की, मी शरीर आहे की शरीराचा चालक आहे, मी घर आहे की घरातील रहिवासी आहे यातील फरकही आत्म्यास समजेनासा झाला आहे.

आपले नेत्र हे जग स्थूल इंद्रियांच्या मदतीने पाहत आहे. जोपर्यंत आपले अध्यात्मिक नेत्र उघडत नाहीत, तोपर्यंत आपण खरे विश्व पाहू शकत नाही. बाह्य जगातील ज्ञान आपण स्थूल इंद्रियांच्या मदतीने प्राप्त करू शकतो. परंतु या इंद्रियांहून वर जाण्याचा मार्ग मनुष्यास माहित नाही. या आपल्या शरीराचे बाह्य जगाकडे जाणारे मार्ग उघडे आहेत तर अंतरामध्ये जाणारे मार्ग बंद आहेत. त्यामुळे स्थूल पदार्थांनी बनलेल्या आपल्या देहापासून आपली सुटका होत नाही. आपले सूक्ष्म रूप आणि सूक्ष्म इंद्रिये आपल्या अंतरातच असतात, परंतु ते आपल्या स्थूल शरीरावरील पडद्यास बाजूस सारू शकत नाहीत आणि अंतरातील दिव्य स्वरूपाचा अनुभव करून देऊ शकत नाहीत. अशा आपल्या बिकट अवस्थेवर काही इलाज आहे का?

मौलांना रूम सांगतात,''आपणांस बाहेरील दुकाने बंद करून आपल्या अंतरामधील दुकाने उघडण्यास शिकले पाहिजे. ज्यांना असे करणे जमले, ते आपले सूक्ष्म नेत्र उघडू शकले. त्यामुळे प्रत्येक वस्तूकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन योग्य असतो.''

कबीर साहेब सांगतात, ''जेथे जेथे मी पाहतो, मला सर्व जग आंधळ्या माणसांनी भरलेले दिसते. ज्यांना बाह्य नेत्र आहेत परंतु त्यांच्या आंतरिक नेत्रांमध्ये चमक नाही, ते लोकदेखील अंधच आहेत, कारण त्यांच्या अंतर्यातील नेत्र उघडलेले नाहीत.''

आपण आपल्या बाह्यजगातील सामान्य नेत्रांद्वारे या वायुमंडळामध्ये काही पाहू शकत नाही, याचा अर्थ असा नाही की वायुमंडळामध्ये काहीच नाही. हे सर्व वायुमंडळ सूक्ष्म जीव–जंतूंनी व्यापलेले आहे, ज्यांना आपले हे चामड्याचे नेत्र पाहू शकत नाहीत. जर का आपले नेत्र या जीव–जंतुएवढे सूक्ष्म बनले किंवा हे जीव–जंतू आपल्या सामान्य स्थूल नेत्रांनी दिसू शकतील एवढे मोठे बनले तरच आपण त्यांना पाहू शकू. अशा अंध लोकांचे वर्णन करत असता गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

अँधे एहि न आखिअनि, जिनि मुख लोइण नाहिं।
अँधे से ही नानका खसमहु घुथे जाहिं।।

वेदशास्त्र सांगतात की परमात्मा अविनाशी आहे. तो सर्वांमध्ये सामावलेला आहे. सर्वांच्या अंतरामध्ये त्याचा ध्वनी गुंजत आहे. परमात्मा अति–सूक्ष्म असून तो मन इंद्रियांच्या परिघापलिकडे आहे. आपल्या सामान्य नेत्रांनी आपण परमात्म्यास पाहू शकत नाही. गुरू नानकसाहेब सांगतात, ''परमात्म्यास पाहावयाचे असल्यास तुम्हांला त्याच्या इतक्या उच्च पातळीवर जावे लागेल. आपल्या अंतरात परमात्म्यास पाहण्याची इच्छा असल्यास आपणांस त्याच्या इतके सूक्ष्म आणि विचाररहित व्हावे लागेल.'' कबीर साहेब या जगाची अवस्था पाहून म्हणतात की येथे सर्वच जण अंध आहेत. काही लोकंच जर अंध असते तर मी समजू शकलो असतो. परंतु येथे सुशिक्षित–अशिक्षित, गरीब–श्रीमंत, मालक–नोकर सर्व एकसमान आहेत, जे पाहू शकत नाहीत, अंध आहेत. एका आंधळ्यास दुसरा अंध व्यक्ती कसा बरे योग्य मार्गावर नेऊ शकेल? निश्चितपणे दोघेजणही खड्ड्यात पडतील.

एक फकीर एका गावात गेला. त्याच्या अंतरामध्ये सर्वांप्रती खूप आपुलकी व सहानुभूती होती. त्याने लोकांना इशारा दिला, ''उद्या एका ठराविक वेळी सर्वत्र असा विचित्र वारा वाहू लागेल की त्याचा एखाद्या मनुष्यास स्पर्श झाला तर तो मनुष्य वेडा होईल.'' काही लोकांनी फकीराच्या सांगण्यावर विश्वास ठेवला व जेव्हा तो वारा वाहू लागला, तेव्हा ते घरामध्ये दारं-खिडक्या बंद करून लपून बसले. ज्यांनी फकीराच्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाही, ते वाऱ्याचा स्पर्श झाल्यावर वेडे झाले. स्वत:चा बचाव करून घेतलेले नशिबवान जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांना सोडून बाकी सर्वजण वेडे झाले होते. सहाजिकच वेडे लोक संख्येने जास्त होते, त्यामुळे त्यांनी नशिबवान लोकांकडे बोट दाखवित म्हटले,''ते वेडे आहेत.''

या जगाची अवस्थादेखील अशीच आहे. परिपूर्ण महापुरुषांनी स्वत:च्या आत्म्यास मन-इंद्रियांच्या सीमेपलिकडे नेऊन मुक्त केले आहे. त्यांनी स्वत:स या स्थूल वातावरणापासून उच्च पातळीवर नेऊन स्वत:च्या आत्म्याच्या दृष्टीस शुद्ध व शांत केले आहे. ते कणाकणात परमात्म्यास पाहतात. असे खूप दुर्लभ परिपूर्ण महापुरुष आहेत ज्यांना सत्याचे ज्ञान झाले आहे.

या जगामध्ये अडकलेल्या सकल मानवतेचा कार्यभाग पोटाशी संलग्न आहे. प्रत्येकजण केवळ स्थूल रूपीच विचार करत आहे. आपल्या जीवनातील सर्व नातेसंबंध स्थूल शरीराशी जोडले गेलेले आहेत. त्यांच्यासाठी हेच मुख्य ध्येय आहे, मग कोणी मजूर असो वा व्यापारी, पैसे कमावणे हेच सर्वांचे ध्येय आहे. अनेक लोकांनी अध्यात्मिक कार्यास व्यवसायचे स्वरूप दिले असून त्यांनी प्राणी-मात्रास पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी स्वत:कडे घेतली आहे. खरेतर त्यांनी सर्वांना शब्दाचे ज्ञान द्यावयास हवे होते, परंतु ते स्वत:च जगामध्ये गुरफटून गेले.

आपल्या अंतरात परमात्मा प्राप्तीची जागृती जर जीवनाच्या अंतिम टप्प्यात आली, तर काय उपयोग? चिमण्यांनी शेतातील सर्व पिक खाऊन

फस्त केल्यानंतर पस्तावण्याचा काय फायदा? हे एक दु:खद सत्य आहे की जेव्हा संत मंडळी आत्म्यांना मार्गदर्शन करण्यासाठी या जगात येतात, तेव्हा तथाकथित विद्वान आणि श्रीमंत लोकं त्यांना नास्तिक तसेच लोकांना गैरमार्गावर नेण्याचा आरोप करतात.

गुरू नानकदेवजी कसूर शहरात प्रवेश करीत असताना, ते लोकांची मती भ्रष्ट करतात, असे म्हणत त्यांच्या शहर प्रवेशावर बंदी घालण्यात आली. धर्माच्या नावावर मोठ–मोठे मठ बनविण्यात आले. सर्वत्र खूप भ्रष्टाचार पसरलेला आहे. अध्यात्मिक कार्य करणारी लोकं संसारिक लोकांपेक्षा अधिक संसारिक असतात. त्यांचे असेच म्हणणे असते, ''खा, प्या आणि मजा करा.'' ते जीवनविषयक खरी तथ्ये कसे समजू शकतील?''

पाण्याच्या बुडबुड्यामध्ये असलेली हवा किती वेळ टिकून राहील? थोडासा वारा अशा बुडबुड्यास नष्ट करून टाकतो. अशीच अवस्था मनुष्य जीवनाची आहे. आपला आत्मा वास करीत असलेले शरीर वाऱ्याची झुळूक आल्यानंतर नष्ट होणाऱ्या पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणेच नष्ट होते. त्याची काहीच निशाणी उरत नाही. जोपर्यंत मनुष्याच्या शरीरात श्वासोश्वास आणि आत्मा वास करीत असतो, तोपर्यंतच मनुष्याचे शरीर कार्यरत असते. जेव्हा आत्मा शरीराचा त्याग करतो, तेव्हा शरीर जीवनविरहीत बनून कोसळून पडते. असे आपण दररोज स्वत:च्या डोळ्यांनी पाहतो की सर्वांनीच एके दिवशी हे जग सोडून जावयाचे आहे, तरीही हे जग भ्रमात गुंतून पडले आहे. आपणदेखील पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणेच अल्प कालावधीसाठी या जगामध्ये आलेलो आहोत. आपल्या जीवनातील अंतिम बदल, ज्यास मृत्यू म्हटले जाते, आपली पाळी आल्यावर मृत्यु आपणांस गाठेलच.

अनेक महान व्यक्ती या जगात आले, परंतु त्यांनाही वेळ आल्यावर त्यांचे शरीर सोडून जावे लागले. म्हणूनच या घटनेवर एकच उपाय आहे, तो म्हणजे आपण आपल्या मर्जीनुसार या शरीराचा त्याग करून उच्च मंडळांमध्ये

मार्गक्रमण करावे. असे केल्याने आपले दोन फायदे होतात. पहिला फायदा म्हणजे आपणांस शरीर सोडण्याच्या प्रक्रियेचे ज्ञान मिळेल. हे काम दररोज केल्याने आपल्या मृत्यूसमयी आपणांस कोणताही त्रास वा भिती वाटणार नाही. दुसरा फायदा म्हणजे उच्च आंतरिक मंडळांमध्ये प्रवेश केल्याने तसेच आपल्या इच्छेनुरूप खाली आल्याने अनोळखी टप्प्यांवर जाण्यास वाटणारी भिती नष्ट होईल? आपणांस असली जीवनावर पूर्ण विश्वास पटेल, त्याचे आपणांस संपूर्ण ज्ञान होईल. जीवनाचे सत्य जाणून घेण्यासाठी मृत्यूची वाट पाहण्यात काहीच अर्थ नाही.

क्राईस्ट सांगतात, ''ज्या दिवशी आमचे मोजकेच असलेले श्वास संपतील आपले शरीर पाण्याच्या बुडबुड्यासमान नाहीसे होईल. ती वेळ कधीही येऊ शकते. आपणांस ताबडतोब या शरीरास त्यागण्याचे तंत्र शिकून घेणे गरजेचे आहे, जेणेकरून आपणांस मृत्यूबद्दल वाटणारी भिती संपून जाईल.'' सर्व जग एखाद्या वेगाने वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहासमान आहे ज्याप्रवाहात आपला आत्मा असहाय्य होऊन वाहत आहे. आत्म्याचा बुडण्यापासून बचावासाठी साखळीच्या आधाराची गरज आहे, नाहीतर तो बुडून तळाशी जाईल. हे मन एक महासागर असून त्यामध्ये प्रचंड लाटा उसळत आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या मनाच्या निरंतर लाटांची उंची वाढवीत आहेत. यांमध्ये मन गटांगळ्या खात असून, त्यास वाचण्याची संधीच कोठे आहे?

पूर्ण संत–सतगुरूंशिवाय कोणीच मनाच्या महासागरापार जाऊ शकत नाही. ज्या व्यक्तीने मनावर ताबा मिळवून या विनाशापासून स्वत:स वाचविले आहे, अशा व्यक्तीच्या सोबतीने इतर लोकही वाचू शकतात. ज्यावस्तूचा आपण शोध घेत आहोत तो आपल्या अंतरात वसत असलेला आत्मा आहे, परंतु आपण हातात दिवा घेऊन त्याचा इतरत्र शोध घेत आहोत. ती वस्तू आपल्या घरात आहे, आपल्या जवळ आहे याची जाणीव आपणांस नसते. अंध व्यक्तीप्रमाणे आपण त्या वस्तूस बाहेर शोधत फिरत राहतो.

त्या वस्तूस आपण कधी धार्मिक पुस्तकांमध्ये, तर कधी बाह्य पूजा–अर्चनेमध्ये, कधी नदी किनारी तर कधी पर्वतशिखरांवर शोधत राहतो. आपणांस सत्याचे ज्ञान नसते. आपल्या मनास इंद्रियरूपी घोडे आनंदाच्या मैदानामध्ये खेचून नेतात. मनुष्याकडे हे पाहण्यासाठीदेखील वेळ नाही की परमात्मा आपल्या अंतर्यात दडलेला आहे आणि तो आपल्या जीवनाहून अतिशय निकट आहे.

मी एकदा कानपूर येथे एका व्यक्तीस भेटलो. त्याने मला सांगितले, ''मी सत्याच्या शोधात पायी चालत गंगोत्रीहून पवित्र जल घेऊन कन्याकुमारी येथे गेलो व त्यानंतर पुन्हा कन्याकुमारीमधील पवित्र जल घेऊन गंगोत्री येथे गेलो, जे शेकडो मैल दूर आहे. परंतु ज्या वस्तूचा मी शोध घेत होतो, ती वस्तू काही मला मिळाली नाही. सत्य आपण कसे जाणून घेऊ शकतो?''

वस्तु कहीं ढूँढै कहीं, केहि विधि आंवै हाथ।
कहै कबीर तब पाइये, जब भेदी लीजे साथ।।

आपल्या अंतरदृष्टीवर आडपडदा आहे. आपणांस एखाद्या योग्य डॉक्टर वा सतगुरूंची गरज आहे, जे त्या पडद्यास ऑपरेशन करून दूर करतील. सर्व संत सांगतात की परमात्मा सर्वांच्या अंतर्यात आहे.

है घर में सूझत नाहीं, लानत ऐसी जिन्द।
तुलसी या संसार को, भया मोतिया बिन्द।।

स्वामी रामतीर्थ लाहोर येथे राहत असताना, एके दिवशी सायंकाळी घराबाहेर फिरत असताना त्यांनी पाहिले की एक स्त्री हातात दिवा घेऊन जमिनीवर काहीतरी शोधत होती. त्यांनी त्या स्त्रीला विचारले, ''आई! तू काय शोधत आहेस?'' त्या स्त्रीने उत्तर दिले, ''मुला! माझी सुई हरवली असून मी तिला शोधण्याचा प्रयत्न करीत आहे.'' स्वामी रामतीर्थ देखील सुई शोधण्यासाठी तिची मदत करू लागले. सर्वत्र शोधूनही सुई सापडली नाही, तेव्हा त्या स्त्रीला त्यांनी विचारले,''आई! तुमची सुई नक्की कोठे

हरवली होती?'' ती म्हणाली,''अरे माझी सुई त्या खोलीमध्ये पडली होती.'' स्वाभाविकपणे स्वामी रामतीर्थ म्हणाले, ''सुई तुमच्या घरामध्ये हरवली असताना तुम्ही येथे ती सुई सापडण्याची अपेक्षा कशी ठेवता?'' या गोष्टीवर तुम्हाला हसू येईल परंतु खरोखरीच आपण काय करीत आहोत?

परमात्मा आत्म्याचे संरक्षण करतो आणि आत्मा शरीरामध्ये वास करतो. हे दिव्य बंधन प्रत्येकाच्या अंतरामध्ये असून, त्यामुळेच आपण जिवंत आहोत. आपण यास इंद्रिये आणि बाह्य वस्तूंमध्ये शोधत आहोत. तृष्णेचा अग्नी या जगास स्वाहा करीत आहे. प्रत्येक घराचा, जातीचा, शहराचा आणि देशाचा बळी दिला जात आहे. हा संसर्गजन्य आजार एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीकडे पसरत आहे, कारण ज्या संगतीत मनुष्य राहतो, तसाच तो बनतो. तुम्ही जर संसारिक लोकांच्या सान्निध्यात राहत असाल, तर त्यांचा प्रभाव तुमच्यावर पडेल व त्याच मार्गाने तुम्ही वाटचाल करू लागाल.

कबीर साहेब सांगतात, ''हा अग्नी सर्व जगास जाळीत असून, ज्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले आहेत, ते यास पाहू शकतात. एखादी व्यक्ती शांतपणे बसून आपल्या अंतर्यात पाहू लागल्यास, तिला जाणीव होईल की कोणतीतरी वस्तू तिला जाळीत आहे. तृष्णेचा अदृश्य अग्नी मनुष्यास भक्ष्य बनवित आहे. केवळ सतगुरूंनी दिलेल्या ज्ञानाच्या मदतीनेच या अग्निपासून आपण वाचू शकतो.''

गुरूवाणीमध्ये लिहिले आहे, ''अग्नी गवताच्या काड्यांना जाळून टाको, परंतु काही काड्या त्यापासून बचावतात.'' मौलाना रूम सांगतात की हृदयास अशा संगतीत राहणे गरजेचे आहे की जे त्या हृदयाची अवस्था जाणतात. जे झाड सुगंधीत फुलांनी बहरलेले आहे, अशा झाडाखाली आपण बसावे. एखादी व्यक्ती अनेक तास सूर्याच्या तप्त ऊनात प्रवास करीत असेल व तो एखाद्या सावली पसरलेल्या वृक्षाखाली बसल्यास, त्या सावलीच्या शितलतेने आपल्या शरीराची झालेली लाही-लाही नाहीशी करून घेतो.

सतगुरूंसमोर आपले मन निर्मळ आणि शांत असते. स्वत:चा बचाव करावयाचा असल्यास सतगुरूंची संगत हा एकच मार्ग आहे. सतगुरू आपणांस केवळ शितलताच देत नाहीत, तर ज्ञानही देतात, जे सांसारिक ज्ञान नसते.

ज्ञान ध्यान धुन जानिए, अकथ कहावै सोय।

शब्दच असली ज्ञान व ध्यान आहे. शब्द आपले जीवन–संगीत आहे. त्याने आपले रोम–रोम व्यापले असून सकल सृष्टीचे पालन–पोषणदेखील शब्दच करतो. त्याचे खरे ज्ञान आपण सतगुरूंच्या कृपेनेच प्राप्त करू शकतो. सुरवातीपासून शब्द आपल्या अंतर्यामध्ये अस्तित्वात आहे, परंतु आपणांस त्याची कल्पना नसते. आपण मायेच्या भ्रमजालामध्ये गुरफटून गेलो असल्याने शब्दस्वरूपी अमूल्य खजिना आपणांस मिळत नाही. जे सतगुरूंच्या सान्निध्यात येऊनही अंतर्यात एकाग्र होत नाहीत, ते या अग्नीमध्ये होरपळून मरतात.

बाह्य अभ्यास आपले रक्षण करू शकत नाही. मायेचा अग्नी इंद्रियांद्वारा आपल्यावर आक्रमण करीत असतो. जेव्हाआपण या इंद्रियांच्या पातळीवरून वरील पातळीवर जाण्याची कला शिकतो व अंतर्यातील शांतीमध्ये आपण सामावून जातो, तेव्हा हा बाह्यजगातील उष्णतेचा दाह सत्याच्या अमृतामध्ये नष्ट होतो. हे आपण एखाद्या वातानुकूलीत खोलीत बसल्याप्रमाणे आहे. तुमचे लक्ष जर अंतर्यात एकाग्र असेल, तर तुम्ही कोठेही जा, तुमच्यावर उष्णतेचा परिणाम होत नाही. ऐहिक जीवनात दुर्भाग्यामुळे आपणांवर संकटांचा पर्वत कोसळतो कारण आपणांस निसर्गाच्या विज्ञानाचे ज्ञान नसते.

गुरू नानकदेवजी महाराज ऐहिक जीवनापासून संन्यास घेण्याचा विचार करीत असताना, त्यांची सासू त्यांच्या दोन्ही मुलांना घेऊन त्यांच्याकडे आली व म्हणाली ''तुम्ही जर संन्यास घेण्याचा निर्णय घेतला होतात, तर या मुलांना जन्मास का घातलेत?'' गुरू नानकदेवजी म्हणाले, ''आई! मी जगाची कैदखान्यातून सुटका करण्यासाठी आलेलो आहे, परंतु तुम्ही मला यामध्येच अडकविण्याचा प्रयत्न करीत आहात. जगास जाळून राख करणाऱ्या या अग्नीस विझविण्यासाठी मी आलेलो आहे.''

गुरू नानकदेवजींनी नंतर परमात्म्यास प्रार्थना केली, ''हे परमात्मा! या जगास भस्म होण्यापासून तुझी कृपावृष्टीच वाचवू शकेल. हा अग्नी तूच शांत करू शकतोस. इंद्रियांचा स्वाद दु:खास कारणीभूत होतो. मनुष्य देहामध्ये मी कोणासही सुखी अवस्थेत पाहिले नाही. येथे प्रत्येक मनुष्य दु:खी आहे.''

सर्व गुरूंनी सकल मानववंशास समजावण्याचा प्रयत्न केला की या शरीर आणि इंद्रियांच्या पातळीवरून उच्च पातळीवर गेल्यास आपणांस श्रेष्ठ जीवनाची अनुभूती येते. या जगाच्या तुलनेत सूक्ष्म आणि कारण मंडळामध्ये जास्त सुखं आहेत, परंतु तरीही ती मंडळे दु:खांपासून मुक्त नाहीत. मनुष्यास पूर्ण सुखाची अनुभूती स्थूल, सूक्ष्म आणि कारण मंडळांच्या पलिकडे गेल्यावरच होते.

आत्म्यांना जागृत करण्यासाठी त्यांच्यावरील कर्मांचे ओझे सतगुरू स्वत:वर घेतात. ते पापांचा तिरस्कार करतात, परंतु पाप करणाऱ्यांसाठी सतगुरूंच्या अंत:करणामध्ये खरे प्रेम असते. प्रत्येकासाठी सुधारण्याची संधी असते, मग तो पापी असो वा पुण्यात्मा. परंतु हे तेव्हाच घडू शकते जेव्हा आपण सतगुरूंच्या आज्ञेचे पालन करतो व बाकी काम सतगुरूंवर सोडतो.

जे प्रेम करू शकत नाहीत, ते कधीच परमात्म्यास प्राप्त करू शकत नाहीत, कारण परमात्मा प्रेमस्वरूपीच आहे. आपला आत्मा परमात्म्याचा अंश आहे. त्यामुळे आत्मादेखील प्रेमच आहे. आपल्या आत्म्यावरील बाह्य आवरणे दूर सारल्यास, त्याखाली दबलेल्या आत्म्यामध्ये प्रेम जागृत होईल आणि तो बहरून येईल. असा मनुष्य प्रेम करण्यायोग्य होतो आणि तो परमात्म्याचे राज्य प्राप्त करू शकतो.

अखेरीस आपणांस सर्व गोष्टींचा त्याग करावा लागणार आहे याची आपणांस जाणीव होणे खूप गरजेचे आहे. या सत्याचे आकलन आपणांस झाल्यास, आपला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलून जाईल. आपल्या हातामधून ही संधी निसटून गेल्यास, ती पुन्हा आपणांस लाभणार नाही.

आपण हा मनुष्यजन्म गमावल्यास, पुन्हा दुसरा मनुष्यजन्म लाभेल याची शाश्वती काय? आपण या देहापासून दूर हटून तसेच मन आणि इंद्रियांपासून मुक्ती मिळविल्यानंतर हे जाणू शकतो की सांसारिक वस्तूंचा उपभोग घेत आपले आयुष्य व्यर्थ घालविण्याचा काय परिणाम होतो? या जगामध्ये आपणांस कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये यावेच लागेल. या शरीराचा त्याग करताना आपणांस घाबरण्याचे काहीच कारण नाही. आपण आपल्या जीवनास योग्य दिशा देण्यासाठी तारतम्य भावाचा वापर केल्यास आपल्या लक्षात येईल की या पुढेही जीवन आहे.

एका राज्याची ही गोष्ट आहे. तेथे दर पाच वर्षांनी नवीन राजाची नेमणूक केली जात असे. त्या पाच वर्षांमध्ये तो राजा सर्वाधिकारी असे. त्याच्या प्रत्येक आदेशाचे काटेकोरपणे पालन केले जाई. त्या पाच वर्षांच्या कालावधीनंतर तेथील प्रजा त्या राजास घनदाट जंगलामध्ये सोडून देई. त्या घनदाट जंगलामध्ये हिंस्र श्वापदे तसेच विषारी सर्पांचा वावर असे. ज्या दिवशी नवीन राजाची निवड होई, तेव्हा तो राजा स्वत:च्या नशिबावर खुष असे, परंतु पाच वर्षांनंतर जेव्हा त्यास जंगलामध्ये सोडले जाई, तेव्हा तो स्वत:च्या दुर्भाग्याच्या नावाने खडे फोडीत राही.

अशा रीतीने अनेक राजे आले आणि त्यांची घटका भरल्यानंतर निघून गेले. एकदा एका सारासार बुद्धीने विचार करणाऱ्या मनुष्याची राजा म्हणून निवड झाली. त्याने विचार केला की पाच वर्षे निघून गेल्यावर आपले काय होईल? त्याच्याकडे सत्सदविवेकबुद्धी असल्याने तो आपल्या भविष्याचा विचार करू लागला. त्याने गांभिर्याने विचार करून सगळ्यांच्या नकळत जंगलतोड करण्यासाठी मजूरांना रवाना केले. खूप मोठी जागा स्वच्छ करवून घेऊन त्याने तेथे बाग–बगिचा तयार केला तसेच सुंदर इमारत बांधून घेतली. त्याजागेचे सर्व सुखसोईंनीयुक्त अशा राज्यामध्ये परिवर्तन झाले. त्याचा राज्य करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्यास राज्याचा

त्याग करण्यास सांगण्यात आले. तो आनंदाने हसत म्हणाला, ''ठिक आहे, चला निघू या!'' ते ऐकून स्वाभाविकपणे प्रजानन आश्चर्यचकित झाले. त्यांनी राजास विचारले की तो आनंदी का झाला आहे? राजा म्हणाला, ''मी अगोदरच माझ्या मुक्कामाची तयारी करून ठेवली असल्याने मला येथून जाण्यामध्ये कसलीच भिती वाटत नाही. आता मी यापेक्षाही जास्त आरामात आणि सुखी राहीन, कारण येथे माझ्यावर ज्या जबाबदाऱ्या होत्या त्या तेथे राहणार नाहीत.''

सर्व आत्म्यांना मनुष्यजन्माच्या रूपाने येथे सुवर्णसंधी लाभलेली आहे. तिचा आपण सदुपयोग करून घ्यावयास हवा. जी काही पुढील तयारी आपण करू शकतो, ती आपण करावयास हवी. तोही दिवस उजाडेल, ज्या दिवशी आपण हे जग सोडून जाणार आहोत. कोणताही मनुष्य येथे कायम राहण्यासाठी आलेला नाही आणि ना तसा कोणी सदोदित राहू शकेल. जर का आपण आपला देह सोडून वरील पातळीवर जाण्यास शिकलो, ज्या अनुभवास मृत्यूनंतरचे जीवन असे म्हटले जाते, तो अनुभव आपल्या भावी घराचा आपणांस परिचय करून देत असतो. त्या स्थानावर केवळ सुख आणि शांती वास करीत असते. त्यामुळे आपणांस मृत्युचे भय उरत नाही.

सर्व जगास मृत्युचे भय वाटते. सर्वजण सदोदित या पृथ्वीतलावर राहू इच्छितात. असे दुर्मिळ जीव असतात, जे असली जीवनाचा शोध घेतात आणि सतगुरूंच्या कृपेने जिवंतपणीच मरण पावतात. तेच जीव खऱ्या अर्थाने परमात्म्याची इच्छा जाणू शकतात.

एका जागृत व्यक्तीस भेटून त्याच्या कृपेने आपण जिवंतपणीच मरणे शिकू शकतो. अशा दिव्य शक्तीच्या सान्निध्यात जेव्हा सामान्य जीव येतो, तेव्हा त्याचे रूपांतर जागृत मनुष्यामध्ये होते, तेव्हाच त्याच्या लक्षात येते की, कर्ता मी नाही तर परमात्मा आहे. सतगुरूंच्या आज्ञेमागच्या रहस्यांचा उलघडा होऊ लागतो.

गुरू नानकसाहेब सांगतात की जो जिवंतपणीच मरतो, त्यास अढळ पदाची प्राप्ती होते. याबाबतीत स्वामीजी महाराज सांगतात, ''आपणांस ही सुवर्णसंधी लाभलेली आहे. केवळ खाणे–पिणे आणि शरीराची निगा राखणे हेच आपले काम नसून आपल्या इतरदेखील जबाबदाऱ्या आहेत. त्यांच्याबद्दल आपण विचारच करीत नाही.

खरेतर मांजरास पाहून स्वत:चे नेत्र मिटून घेणाऱ्या कबुतराप्रमाणेच आपली अवस्था आहे. खरेतर मांजर तेथेच असते, परंतु कबुतरास खऱ्या परिस्थितीची जाणीव तेव्हाच होते जेव्हा मांजराने त्या कबुतराची मान आपल्या जबड्यात पकडलेली असते. आपण शरीर नसून, शरीराचे चालक आहोत. या जगाकडे आपण देह पातळीवरून पाहत असतो. हे जग बदलत आहे व आपले शरीरदेखील त्याचप्रमाणे बदलत आहे.

वैज्ञानिकांनी हे सिद्ध केले आहे की आपल्या हाडांमध्येदेखील सात वर्षांनंतर बदल घडतो. हा बदल निसर्गाच्या नियमानुसारच होत असतो. दोन वस्तूंमध्ये एकाच गतीने जरी बदल घडत असला, तरी त्यांमध्ये होणाऱ्या बदलांची गती आपणांस दिसत नाही.

नदीच्या प्रवाहामध्ये एखादी नांव जात असते. त्या नांवेमध्ये बसलेल्या प्रवाशांना नांवेचा वेग जाणवत नसतो. परंतु किनाऱ्यावर उभ्या असलेल्या मनुष्यास मात्र तो वेग स्पष्टपणे दिसत असतो. तो नांवेमधील प्रवाशांना जागृत करण्यासाठी इशाराही देतो की, ''बंधुंनो! तुमची नांव वेगाने वाहत आहे.'' परंतु आपण भ्रमात फसलो असल्याने आपण इशारा देणाऱ्यावर विश्वास ठेवत नाही. हा भ्रम दूर सारून आत्म्याच्या स्तरावर गेल्यास शरीरामध्ये होणारे बदल आपण स्पष्टपणे पाहतो. अशाचप्रकारे हे जग परिवर्तनशील आहे. पवित्र धारणेने आपण विचार केल्यास हे जग, शरीर आणि यांच्या संबंधात असलेली प्रत्येक वस्तू आपली असते. परंतु अशी अनुभूती आपणांस उच्च पातळीवर गेल्यानंतरच होते.

जीवनात होत असलेल्या उतार–चढावांमुळे आपल्यावरील दु:खांचा प्रभाव नाहीसा होतो, मृत्युचे वाटणारे भय नाहीस होते तसेच बाह्य जगातील स्वाद आवडेनासे होऊ लागतात. उच्च पातळीवर पोहोचल्यावर जेव्हा आपण अमृतपान करू लागतो तेव्हा आपल्या स्वयंप्रकाशामध्ये सर्व वस्तू स्पष्ट दिसू लागतात. त्यानंतर आपण जे काही काम करू त्याचे फलस्वरूप म्हणून आपणांस सफलताच लाभते. कारण आपण जी काही इच्छा करीत असतो, त्यावर आपल्या लक्षाचे नियंत्रण असते.

सर्वच सतगुरूंनी आपणांस सांगितले आहे, ''हे बंधुंनो! तुम्ही मनुष्यप्राणी आहात, पशु नाही.'' मौलाना रूम सांगतात, ''आपली वर्तणुक पशूंप्रमाणे असता कामा नये. पशू त्यांचे जीवन खाण्या–पिण्यात व्यतीत करतात. यात खरेतर काहीच वावगे नाही. परमात्म्याने मानवास इतर सर्व प्राण्यांमध्ये प्रमुख स्थान दिले आहे. त्यामुळे आपणांस सदैव प्रगतीच्या दिशेला पाहणे गरजेचे आहे. मनुष्यास लाभलेल्या दैवी ठेवेस संरक्षित ठेवणे हे त्याचे कर्तव्य आहे. नर–नारायणी देहास देव–देवतादेखील नमन करतात कारण यादेहाच्या माध्यमातूनच परमात्म्याची प्राप्ती केली जाऊ शकते. या मनुष्य जीवनात सदर कार्य करून आपण आपले जीवन सफल करावे.''

शिपंल्यामध्ये पाण्याचा थेंब पडल्यावर त्या थेंबाचा मोती बनतो. मोती तयार झाल्यानंतर जर शिंपले तुटले तर काही फरक पडत नाही. परंतु मोती तयार होण्यापूर्वीच जर ते तुटले, तर त्यामध्ये पडलेला पाण्याचा थेंब सुकून जातो. त्याचा मोती बनत नाही. अशा अवस्थेत आपणांस मृत्युचे भय वाटू लागते. कबीर साहेब सांगतात, ''सर्व जग मृत्युस घाबरते, परंतु मृत्युमुळे मला मात्र खूप आनंद होतो, कारण मृत्युद्वारेच आपणांस पूर्णशांती लाभते. देहरूपी आवरण दूर सरल्यानंतर आपण परमात्म्याच्या सान्निध्यात असतो.''

मौलाना रूम जेव्हा अतिशय आजारी होते तेव्हा लोकांनी त्यांच्याकडे येऊन त्यांना विनंती केली त्यांनी जिवंत राहावे. नेत्र उघडून मौलाना रूम

म्हणाले, ''बंधुंनो! या प्रार्थनेचा तुम्हांस फायदा होवो. काय तुम्हांस कल्पना नाही की या देहरूपी वस्त्राने मला माझ्या प्रभूपासून दूर ठेवले आहे? हे वस्त्र जर दूर झाले, तर मी कायमचा प्रभुशी एकरूप होईल.''

ज्या आत्म्यांचे आंतरिक नेत्र उघडतात, ते म्हणतात की याच जीवनामध्ये आम्ही परमात्म्यास प्राप्त करून घेतले आहे. नि:संशय परमात्मा आमच्या सोबत आहे. आम्ही त्याच्यापेक्षा निराळे नाही आहोत. इंद्रियांचे भोग भोगता–भोगता आपणांस आपल्या खऱ्या स्वरूपाचा विसर पडलेला आहे. त्यामुळे आपण आपले लक्ष बाह्यजगातून दूर करून अंतर्यात एकाग्र करावयास हवे.

आपण बाहेर पाहतो. परंतु आपली आंतरिकदृष्टी बंद आहे. म्हणजेच आपण अंध नाहीत काय? आपले बाह्य कान उघडे आहेत. परंतु आपल्या अंतरामध्ये गुंजत असलेले संगीत आपण ऐकू शकत नाही, कारण आपले आंतरिक कर्ण बहिरे आहेत. आपल्या अंतरामध्ये नामरूपी अमृताचा प्रवाह वाहत आहे, परंतु मनुष्य सांसारिक नशेमध्ये मशगुल आहे.

शम्स तरबेज सांगतात,''हजारो लोकांना जन्मानंतर मी दृष्टी दिली आहे, जेणेकरून ते परमात्म्यास पाहू शकावेत. अनेक अंध लोकांना नामदान दिले आहे. ते आनंदाने सांगतात की, त्यांनी उगवता सूर्य पाहिला आहे. तुम्ही अंतर्यात पाहू शकणे याचा तुम्ही बाह्य जगात पाहू शकता किंवा नाही याचा काहीच संबंध नाही. दुर्दैव असे आहे की अतिशय थोडी लोकंच या ज्ञानाशी परिचित आहेत. खरेतर हे अतिशय जुने ज्ञान आहे. हा संसार परिपूर्ण सतगुरूंच्या उपस्थितीखेरीज कधीच राहिलेला नाही. सतगुरू जेव्हा या जगामध्ये येतात, तेव्हा ते या पुरातन सत्याचे नुतनीकरण करतात. परंतु ते हे जग सोडून गेल्यानंतर, मनुष्य पुन्हा हे ज्ञान विसरून जातो. मागणी आणि पुरवठा हा नियम सदैव कार्यरत असतो. भुकेलेल्यास अन्न आणि तहानलेल्यास जल प्राप्त होते. जेव्हा शिष्याची तयारी होते तेव्हा सतगुरू त्वरित प्रगट होतात.

***

सत्संगाची महानता

परमसंत हुजूर बाबा सावन सिंहजी महाराजांनी गोष्टीरूपात समजावलेले एक अध्यात्मिक तत्व

संतांचे सत्संग ऐकून आपणांस मुक्तीचे द्वार प्राप्त होते. वेदांमध्ये नमूद केले आहे की सत्संगाशिवाय कोणासही सुख आणि आनंद लाभत नाहीत. सत्संग खूप मोठी संपत्ती आहे. परंतु आपणांस त्याची कदर नसते. एखाद्याने सत्संगाचा एकजरी शब्द आत्मसात केला, तरीही त्याच्या जीवनामध्ये परिवर्तन येते, मग संपूर्ण सत्संगाबद्दल काय सांगावे?

एक चोर होता. त्याच्या मृत्युसमयी त्याने त्याच्या एकुलत्या एका मुलास जवळ बोलावून उपदेशरूपी दोन गोष्टी सांगितल्या. पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही मंदिरात जाऊन सत्संग वा उपदेशाचे श्रवण करू नये आणि दुसरी गोष्ट म्हणजे चोरी करताना जर तू पकडला गेलास मग भलेही त्यासाठी तुला फाशीची शिक्षा दिली गेली तरी तू केलेला गुन्हा कबूल करू नकोस.

एके दिवशी तो तरुण मुलगा एका घरात चोरी करून परतत असताना त्याने समोरून एका पोलिसास येताना पाहिले. शेजारीच एक पायवाट होती, त्या पायवाटेने तो स्वत:चा बचाव करण्यासाठी पळाला. तेथेच एक मंदीर होते, तेथे लोकांना उपदेश दिला जात होता. परंतु त्या तरुणास त्याच्या वडिलांनी त्यास दिलेली शिकवण आठवली आणि दिल्या जाणाऱ्या उपदेशाचा एकही शब्द आपल्या कानी पडू नये म्हणून त्याने कानात बोटे घातली. परंतु कानात बोटे घालण्यापूर्वीच त्याने एक वाक्य ऐकले की देवी–देवतांची कधीच सावली पडत नाही. नंतर एके दिवशी चोरीच्या आरोपाखाली तो तरुण पकडला गेला. त्याला राजासमोर उभे केले गेले. राजाने त्यास विचारले, ''तू चोरी केली आहेस काय?''त्यावर तो तरुण म्हणाला,''मी चोरी केलेली नाही.''

त्या तरुणास मारहाण केली गेली, तरीही त्याने गुन्हा कबूल केला नाही. त्यानंतर त्यास तुरुंगामध्ये टाकले गेले. राजाच्या पोलीस दलामध्ये एक खूप चतूर महिला होती. ती राजास म्हणाली की याच्याकडून त्याने केलेला गुन्हा कबूल करून घेते. तिने आखलेल्या योजनेस राजाने मंजूरी देऊन ते काम तिला सोपविले.

त्या महिलेने रात्री दुर्गामातेचा वेष परिधान केला. दोन नकली हात शरीरास जोडले, दोन्ही हातांमध्ये दोन जळत्या मशाली पकडल्या. एक नकली वाघ बनविला व त्यावर आरूढ होण्याचे सोंग घेत, खूप कोलाहल

माजवित ती चालू लागली. तुरुंगाचे दरवाजे अचानक उघडले गेले आणि तिच्या हातामधील मशालींच्या प्रकाशाने तुरुंग उजाळून निघाला.

त्या बिचाऱ्या तरुणाने पाहिले की समोर साक्षात दुर्गामाता अवतरली आहे. त्यास आश्चर्याचा धक्का बसला आणि त्याने तिच्या चरणी लोटांगणच घातले. ती नकली दुर्गादेवी त्यास आशीर्वाद देत म्हणाली, ''तू लक्षपूर्वक ऐक! मी दुर्गादेवी आहे. मी तुझ्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी आलेली आहे. तू चोरी केली असल्यास मला तसे खरे सांग. तू जर मला खरे सांगितलेस, तर मी तुझी तुरुंगातून सुटका होण्यासाठी मदत करीन.''

तो चोर स्वत:चा गुन्हा कबूल करणारच होता, तेवढ्यात त्याने त्या नकली दुर्गामातेची जमिनीवर पडलेली सावली पाहिली. मंदिरामध्ये दिल्या जाणाऱ्या उपदेशामधील त्याने ऐकलेले वाक्य त्याच्या लक्षात आले की देवी–देवतांची कधीच सावली पडत नाही. त्याच्या लगेच लक्षात आली की हे सर्व ढोंग रचले जात आहे. तो चोर म्हणाला, ''हे माते! मी कोणताच गुन्हा केलेला नाही. परंतु राजा मला विनाकारण शिक्षा देत आहे.''

दुसऱ्या दिवशी ती चतूर महिला राजास म्हणाली, ''हा तरुण अपराधी नाही.'' राजाने त्या तरुणाची सुटका करण्याचा आदेश दिला.

चोर अतिशय खूष झाला. त्याने विचार केला! हे किती चांगले झाले की सत्संगामधील फक्त एकच वाक्य ऐकल्याने माझी तुरुंगातून सुटका झाली. जर मी संपूर्ण सत्संग ऐकला तर माझे आयुष्यच बदलून जाईल. माझ्या जीवनाची कायापालट होईल. त्याने पुढे नित्यनेमाने सत्संग ऐकण्यास सुरूवात केली. त्याच्या परिणामस्वरूप त्याने चोरी करण्याचे काम सोडून दिले आणि तो तरुण महात्मा बनला.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत-बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने संतबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे सत्संगाचे कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित होत आहेत. संगतच्या चरणी नम्र विनंती आहे की त्यांनी सत्संगात सहभागी होऊन संतवचनांचा व ध्यान-अभ्यासाचा लाभ घ्यावा.

०७ ते ११ सप्टेंबर २०१६

२८ ते ३० ऑक्टोबर २०१६

२५ ते २७ नोव्हेंबर २०१६

२३ ते २५ डिसेंबर २०१६

***